# काणे कुलप्रतिष्ठान

रजिस्टर नं. — ई ८५१ (रत्नागिरी) दि. १-४-२००९

दूरध्वनी - ०२० २४२२७२४१भ्रमण -९९२३१०९०३२ ई मेल sakane@yahoo.co.in

पुणे ४११००९

१८ डिसेंबर २०१७

महोदय,

स. न. वि. वि.

१२ वे काणे कुलसंमेलन ह्या वर्षी पुणे येथे शुक्रवार दि.२६ जानेवारी २०१८ दुपारी ४ ते रात्री ९ व शनिवार दि. २७ जानेवारी २०१८ सकाळी ९ ते दुपारी ५ या कालावधीत वेदशास्त्रोत्तेजक सभा, सदाशिव पेठ पुणे येथे होणार आहे. सोबत संमेलन स्थानाचा पत्ता व संमेलनाचा तपशील असलेली कार्यक्रम पत्रिका जोडली आहे.

**ह्या संमेलनाचे खास वैशिष्ट्य म्हणजे सुप्रसिद्ध निवेदक श्री सुधीर गाडगीळ यांचा " मुलाखतीतून मला भेटलेली माणसे " हा कार्यक्रम.** संमेलनाच्या नियोजनासाठी उपस्थितांची संख्या माहीत असणे जरुरीचे आहे. यासाठी आपले शुल्क दि. १० जानेवारी२०१८ पर्यंत बँक ऑफ महाराष्ट्र टिळक रोड शाखा IFSC MAHB0000041 येथील "काणे कुलप्रतिष्ठान" या बचत खात्यात जमा करून त्याची माहिती कार्यवाह श्री. सुहास काणे यांना कळवावी.

**संमेलन शुल्क १२ वर्षावरील व्यक्तीस रुपये ३००/- व ८ ते १२ वयातील व्यक्तीस रुपये २००/-**

संमेलनात प्रति वर्षी एस.एस.सी/सी.बी.एस.सी.बोर्डात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या काणे कुळातील प्रत्येकी एका विद्यार्थ्याला व विद्यार्थिनीला रोख रुपये २०००/- व सन्मान चिन्ह असा पुरस्कार दिला जातो. यासाठी प्रतिष्ठानच्या सदस्यांनी आपल्या कुटुंबातील, मार्च २०१७ मध्ये उत्तीर्ण झालेल्या मुलाची अथवा मुलीची माहिती व गुणपत्रिकेची झेरॉक्स दि. १० जानेवारी २०१८ पर्यंत कार्यवाह श्री. सुहास काणे यांचेकडे पाठवावी.

संमेलनामध्ये ८० वर्षे पूर्ण केलेल्या व याआधी सत्कार न झालेल्या प्रतिष्ठानच्या ज्येष्ठ पुरुष व महिला सदस्यांचा तसेच संमेलनास प्रथमच येणाऱ्या काणे यांच्या माहेरवाशिणींचाही आपण सत्कार होईल. व्यवस्थेच्या सोयीसाठी आपल्या घरातील संमेलनास येणाऱ्या ज्येष्ठ सदस्यांची माहिती व माहेरवाशिणींची आधीची व सध्याची नावेही दि. १८ जानेवारी २०१८ पर्यंत कार्यवाह श्री. सुहास काणे यांचेकडे कळवावी.

संमेलनास येण्यासाठी प्रतिष्ठानचे सदस्य असणे आवश्यक नाही, त्यामुळे आपल्या सदस्य नसलेल्या मुलांनाही संमेलनास येण्याचा आग्रह करावा. आपणास विनंती की, आपले आणि नातेवाईक व परिचित काणे बंधूंचे पत्ते व फोन नं. जरूर कळवावेत.

कळावे

आपला

सुहास काणे

**टीप :— संमेलनाचे स्थान हे मंगल कार्यालय नसल्याने परगावाहून आलेल्या सदस्यांची निवासाची सोय होणार नाही. सदस्यांना आपल्या निवासाची व्यवस्था स्वतः करावी लागेल.**

संमेलनाचे शुल्क खालील ठिकाणी जमा करता येईल.

कल्याण श्री. प्रसाद प्रभाकर काणे मो. क्र. 9819311157

डोंबिवली श्री. चिंतामणी केशव काणे मो. क्र. 9869207984

IMG-20180106-WA0154.jpg

॥ श्री लक्ष्मीकेशव प्रसन्न ॥ ॥ श्री हरीहरेश्वर प्रसन्न ॥

## १२ वे काणे कुलसंमेलन, शुक्रवार दि. २६ जानेवारी व शनिवार दि. २७ जानेवारी २०१८

कार्यक्रम पत्रिका

**शुक्रवार दि. २६ जानेवारी २०१८ दुपारी ३.३० ते रात्री ९.००**

| दुपारी ३.३० ते ४.१५ | | विश्वस्त बैठक | |
|---|---|---|---|
| ४.०० ते ४.३० | सदस्य नोंदणी, चहापान | ४.३० ते ४.४० | प्रतिमा पूजन,दीप प्रज्वलन |
| ४.४० ते ४.५५ | स्वागत व विश्वस्त परिचय | ४.५५ ते ५.१० | कार्यक्रमाची रूपरेषा |
| ५.१० ते ५.१५ | श्रद्धांजली | ५.१५ ते ५.२५ | प्रास्ताविक |
| ५.३० ते ७.०० | वार्षिक सर्व साधारण सभा | ७.१५ ते ८.३० | सांस्कृतिक कार्यक्रम |
| | | ८.३० ते ९.०० | भोजन |

**शनिवार दि. २७ जानेवारी २०१८ सकाळी ९.०० ते दुपारी १७.००**

| | | | |
|---|---|---|---|
| ९.०० ते ९.३० | सदस्य नोंदणी, चहापान | १२.३० ते १.४५ | भोजन व विश्रांती |
| ९.३० ते ९.४० | प्रतिमा पूजन,दीप प्रज्वलन | २.०० ते २.३० | गंमतीचे खेळ |
| ९.४० ते ९.४५ | स्वागत | २.०० ते २.४५ | मुक्त चर्चा |
| ९.४५ ते ९.५५ | कार्यक्रमाची रूपरेषा | २.४५ ते ३.०० | चर्चा समारोप |
| ९.५५ ते १०.०५ | प्रास्ताविक | ३.०० ते ३.४५ | कार्यकर्ता परिचय |
| १०.०५ ते १०२५ | जेष्ठ सदस्य व माहेरवाशिण सत्कार | ३.४५ ते ४.०५ | अध्यक्षीय भाषण |
| १०.३० ते ११.०० | पुरस्कारार्थी परिचय व पुरस्कार वितरण | ४.०५ ते ४.१५ | आभार प्रदर्शन |
| ११.०० ते ११.१५ | पुरस्कारार्थींचे मनोगत | ४.०५ ते ४.१५ | आभार प्रदर्शन |
| ११.१५ ते १२.१५ | श्री सुधीर गाडगीळ " मुलाखतीतून मला भेटलेली माणसे " | ४.१५ | चहापान |

**सर्व साधारण सभा व संमेलन स्थान व पत्ता :** -- वेदशास्त्रोत्तेजक सभा, सदाशिव पेठ पुणे ४११०३०

१) टिळक रोड वरून एस.पी. कॉलेज पुढील चौकात उजव्या बाजूस वळल्यावरपुढील चौकात, हॉटेल विश्वच्या समोर वेदशास्त्रोत्तेजक सभेची इमारत आहे.

२) स्वारगेट पासून नेहरू स्टेडीयमच्या रस्त्यावरून, सारसबाग चौकात उजव्या बाजूस वळणे,बाबूराव सणस ग्राउंड संपल्यानंतर लगेच डाव्या बाजूस वळल्यावर, पहिल्या चौकात उजव्या हाताला हाटेल विश्वच्या समोर वेदशास्त्रोत्तेजक सभेची इमारत आहे.

**IMG-20180106-WA0155.jpg**